सभा क्र.२/२०१५-१६

# जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर
## जिल्हा उद्योग मित्र समिती सभा इतिवृत्तांत

दिनांकः-१५.३.२०१६
वेळ : सांय ५.३० वा

---

सभेच्या प्रारंभी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर यांनी मा. जिल्हाधिकारी यांचे व उपस्थितांचे स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

| अ क्र | सूचिवरील विषय | विषय उपस्थित केलेली संस्था | संबंधित खाते | सभेतील विषयावर झालेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **६** |
| १ | दि ०८.०६.२०१५ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर | दिनांक ०८.०६.२०१५ रोजी झालेल्या सभेचा इतिवृतांत सर्व संम्मतीने कायम करणेत आला. |
| २ | शिरोली औद्योगिक महामंडळाच्या क्षेत्रामध्ये चॅनेल गटारीची उपलब्धता करणे बाबत | शिरोली मॅन्यु. असो. | कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म. कोल्हापूर | सदर कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकात रु.४३.६८ लक्ष (नक्त) इतक्या रक्कमेस दि. ४.३.२०१६ रोजी तांत्रिक मंजूरी मिळालेली आहे. लवकरच ई निविदा प्रणालीतून सदर कामाच्या निविदा काढण्यात येणार आहेत. निविदा मंजूरी नंतर सदर काम ०६ महिन्यात पूर्ण होणार आहे. त्यामुळे सदर विषय कमी करावा अशी विनंती कार्यकारी अभियंता मराऔवि महामंडळ यांनी सभेत केली<br>मा अध्यक्षांनी सूचित केले की, सदर विषया बाबत पूर्ण झालेल्या कार्यवाहीचा अहवाल अध्यक्ष व सदस्य सचिव जिउमि यांना सादर करावा अशा सूचना दिल्या. |
| ३ | जी ब्लॉक मधील उद्योजकांना बांधकाम करणेकरीता पाणी कनेक्शन आवश्यक असलेने त्या ठिकाणी एमआयडीसी कडून पाण्याची पाईप लाईन टाकण्यात यावी | मॅन्यु. असोसिएशन ऑफ कागल हातकणंगले | कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ | सदर ठिकाणचे रस्ते, जलवितरण वाहिनीचे काम दि. २८.१.२०१६ रोजी व दिवाबत्ती कार्यान्वित करण्याचे काम दि. २५.२.२०१६ रोजी पूर्ण झालेले आहे. जी ब्लॉकमध्ये सर्व सुविधा पुरविण्याचे काम पूर्ण झालेले आहे. आता उद्योजकांना बांधकाम पूर्ण करुन, उद्योग सुरु करण्यास कोणतीही अडचण नाही. सदर विषया बाबत कार्यवाही पूर्ण झाले आहेत त्यामुळे सदर विषय सूचीवरुन कमी करावा असे कार्यकारी अभियंता, मराऔविम मंडळ यांनी सभेत केली आहे. अध्यक्षांच्या परवानगीने सदर विषय कमी करण्यात आला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | जेणेकरुन उद्योजकांना बांधकाम पूर्ण करुन उद्योग सुरु करता येईल | | | |
| ४ | पंचतारांकित औद्योगिक वसाहती मधील काही अंतर्गत असणारे रोड झालेले नाहीत ते करण्यात यावेत | मॅन्यु. असोसिएशन ऑफ कागल हातकणंगले | कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ | सदर कामाच्या निविदा योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे पहिल्या मागणीवेळी मंजूर झाल्या नाहीत. आता सदर कामांच्या नविन प्रारुप निविदा संचास दि. ११.३.२०१६ रोजी मंजूरी मिळालेली आहे. लवकरच ई निविदा प्रणालीतून सदर कामाच्या निविदा काढण्यात येणार आहेत निविदा मंजूरी नंतर सदर काम ९ महिन्यात पूर्ण होणार आहे. असे कार्यकारी अभियंता, मराऔविम मंडळ यांनी सभेत केली आहे.<br>सदर काम ६ महिन्याच्या आत पूर्ण करण्याच्या सूचना मा अध्यक्षांनी मराऔविम मंडळाच्या अधिका-यांना दिल्या. |
| ५ | औद्योगिक वसाहतीमधील कचरा निर्मुलन करणेबाबत | गोकुळ शिरगांव मॅन्यु. असोसिएशन गोकुळ शिरगांव, कोल्हापूर | कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ | याबाबतची कार्यवाही नुकतीच पूर्ण झालेली आहे. गोकुळ शिरगांव औद्योगिक क्षेत्रातून गोकुळ शिरगांव ग्रामपंचायतीस कर रुपात मोठा महसूल मिळतो. महामंडळाच्या धोरणानुसार औद्योगिक क्षेत्रातील कचरा उठावाची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीची आहे. अशी माहिती कार्यकारी अभियंता मराऔविमं मंडळ यांनी सभेत सांगितले.<br>या संदर्भात मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना अध्यक्षांच्या स्वाक्षरीने अर्धशासकीय पत्र दयावे तसेच याबाबत सद्यपरिस्थित मऔवि महामंडळ यांनी कार्यवाही सुरु ठेवावी अशा सूचना मा अध्यक्षांनी दिल्या. |
| ६ | वेस्ट मटेरियलसाठी जागा उपलब्ध करणे बाबत | शिरोली मॅन्यु . असो. शिरोली एमआयडीसी | १. प्रादेशिक अधिकारी म.औ.वि.म. कोल्हापूर<br>२. कार्यकारी अभियंता म.औ.वि.म. कोल्हापूर | फौड्री मधून निघणार वेस्ट मटेरियल टाकणेसाठी महसुल खात्याकडून १४ गुंठेची जागा मिळाली तथापी प्रदुषण होत असल्याने ग्रामस्थांचा विरोध आहे या संदर्भात प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील अधिकारी व संबंधित असोसिएशन यांनी दि. २२.१.२०१६ रोजी संयुक्त पाहणी करुन प्रदूषण होते किंवा नाही याबाबतचा अहवाल सादर करणेचे असे मागिल सभेत ठरले होते.<br>या बाबत मा अध्यक्षांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील अधिका-यांना विचारणा केली असता सदर विषया बाबत संबंधित संघटने कडून कोणताही लेखी प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त नाही. सदर संघटनेकडून लेखी प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील कार्यप्रणालीनुसार तात्काळ योग्यती कार्यवाही करणेत येईल असे प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील अधिका-यांनी सभेत सांगितले. संबंधित संघटनेने सविस्तर प्रस्ताव प्रदुषण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | नियंत्रण मंडळाकडे सादर करावा व पुढील बैठकी पूर्वी संयुक्तरित्या अहवाल सादर करावा अशा सूचना मा अध्यक्षांनी दिल्या. |
| ७ | एन.एच.४ वरील लक्ष्मी टेकडी येथे उड्डाण पूल करणे व सर्व्हिस रोड करणे तसेच गोकुळ शिरगांव औद्योगिक वसाहतीमधील फाटयावरील उड्डाण पूल चार पदरी करणे बाबत | मॅन्युफॅक्चर्स असो. कागल हातकणंगले | कार्यकारी अभियंता, रस्ते विकास महामंडळ कोल्हापूर | निवासी अभियंता, रस्ते विकास महामंडळ यांनी सांगितले की, ६ पदरी रस्त्याचा प्रस्ताव शासन स्तरावर असून सदर प्रस्तावास मंजूरी मिळाल्या नंतर या विषयाच्या निपटारा होणार आहे तथापि सद्यपरिस्थतीत सर्व्हिस रोड करणे संदर्भाने Technical expert यांचा सल्ला घेवून सर्व्हिस रोड करणे बाबत योग्यती कार्यवाही करणेत येईल असे निवासी अभियंता, रस्ते विकास महामंडळ यांनी सभेत सांगितले.<br>केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल कार्यालयास सादर करावा अशा सूचना मा अध्यक्षांनी दिल्या. |
| ८ | महानगपालीकेच्या बजेटमध्ये शहरातील औद्योगिक विकास होणे साठी रु.१०.००कोटीची तरतूद करणेबाबत | कोल्हापूर इंजिनिअरींग असोसिएशन | महानगरपालीका कोल्हापूर | महानगरपालिकेने शहरातील औद्योगिक विभागात आवश्यकत्या सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत व या कामासाठी शासनाच्या / महापालिकेतील उत्पनाच्या प्राप्त स्त्रोत्रानुसार प्राधान्याने कार्यवाही करावी असे अध्यक्षांनी सूचित केले. |
| ९ | पंचतारांकित औ. वसाहती मध्ये उपलब्ध असणारी केएमटी सेवा डी ब्लॉक पर्यंत वाढविण्यात यावी. | कागल-हातकणंगले पंचतारांकित मॅन्यु. असो | कोल्हापूर महानगरपालीका | पूर्व तयारी बैठकीस सहा.वाहतूक निरिक्षक कोमनपा उपस्थित होते या बाबतचा प्रस्ताव दि.२७.१.२०१६ पूर्वी वरिष्ठाकडे पाठवून त्याची प्रत समितीस सादर करु असे सांगितले होते<br>या बाबत मा अध्यक्षांनी विचारणा केली असता, उपस्थित सहा.वाहतूक निरिक्षक यांनी समाधानकारक उत्तर न दिलेने मा अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली व ४ दिवसात याबाबत योग्यती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल अध्यक्ष व सदस्य सचिव जिल्हा उद्योग मित्र यांना पाठवावा अशा सूचना दिल्या. |
| १० | पंचतारांकित औद्यो. वसाहती मध्ये बीएसएनएल मार्फत उपलब्ध असणारी दुरध्वनी/इंटरनेट सेवा वारंवार नादुरुस्त होते | कागल-हातकणंगले पंचतारांकित मॅन्यु. असो | बीएसएनएल, कोल्हापूर /कागल | सदर ठिकाणी अतिरिक्त ब्रॅांड बॅंड नेटवर्क गेटवे सर्वर स्थापित केला आहे त्यामुळे ब्रॅांडची सेवा नियमितपणे सुरु झाल्याचे तसेच सदर ठिकाणी एका कर्मचा-याची नियुक्ती केल्याचे व यापुढे अडचणी निर्माण होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे<br>तसेच सदर ठिकाणी ओएफसी केबल टाकण्याची निविदा प्रक्रिया चालू असल्याची माहिती उपमंडल अभियंता, बीएसएनल यांनी सभेत सांगितले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | फाईव्ह स्टार एमआयडीसीमध्ये पोस्ट ऑफीससाठी जागामिळणे बाबत | मॅन्यु. असोसिएशन ऑफ कागल हातकणंगले | इन्स्पेक्टर, पोस्ट, कागल सब डिव्हीजन, कागल | सदर बैठकीत सविस्तर चर्चा होवून वरिष्ठ अधिक्षक पोस्ट कार्यालय, यांनी भूखंड मागणी बाबतचा सविस्तर प्रस्ताव एमआयडीसीकडे सादर करावा. एमआयडीसीने सदरचे कार्यालय शासनाचे कार्यालय असलेने व सदरची सेवा एमआयडीसीतील उद्योजकांना उपलब्ध होणार असल्याने, भूखंड अल्पदरात उपलब्ध होण्यासाठी एमआयडीसीने त्यांच्या वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव पाठवावा व या बाबत एमआयडीसीने मा जिल्हाधिकारी यांना अवगत करावे.<br>तसेच भूखंड प्राप्ती नंतर सदर ठिकाणी प्रस्तावित इमारतीसाठीचा आवश्यक निधी उपलब्ध झाले नंतर सदर ठिकाणी नियमानुसार बांधकाम करण्याची कार्यवाही घेणे बाबत मा अध्यक्षांनी सूचित केले. |
| १२ | ईएसआय हॉस्पीटल सुरु करणेबाबत | कोल्हापूर इंजि. असोसीएशन, कोल्हापूर | ईएसआय हॉस्पीटल | कर्मचारी राज्य विमा निगम कार्यालय, पुणे यांनी दिनांक २१.१.२०१६ रोजी कळविले नुसार सदर हॉस्पीटलची दुरुस्ती करण्यासाठी गोवा सेंट्रल सर्कल, पीडब्लूडी यांचे कडे इस्टीमेटची मागणी करण्यात आली आहे सदर प्रस्तावाच्या मंजूरी नंतर कार्यवाही घेण्यात येईल असे बैठकीत सांगितले. याबाबत पाठपुरवा करुन अहवाल सादर करावा अशा सूचना मा अध्यक्षांनी दिल्या. |
| १३ | गोकुळ शिरगांव औ. वसाहतीमध्ये प्रवेश करताना मुख्य प्रवेश द्वाराजवळ महामार्ग हद्दीमध्ये असणारी अतिक्रमणे व मराऔविम मंडळ क्षेत्र कागल येथील अतिकमणे काढणे बाबत | गोकुळ शिरगांव मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन | १) कार्यकारी अभियंता, एमआयडीसी<br>२) राष्ट्रीय महामार्ग विभाग | राष्ट्रीय महामार्ग विभाग यांचे मार्फत संयुक्त कार्यवाही अपेक्षित आहे. त्यासाठी गोकुळ शिरगांव व कागल-हातकणंगले औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमणे हटविण्यासाठी पोलीस विभागामार्फत बंदोबस्त मिळणेविषयी दि. ३.२.२०१६ रोजी पत्र दिले असल्याचे मा कार्यकारी अभियंता एमआयडीसी यानी सभेत सांगितले.<br>कार्यकारी अभियंता, एमआयडीसी/राष्ट्रीय महामार्ग विभाग तसेच पोलीस विभाग यांनी अतिक्रणे हटवणे संदर्भाने संयुक्त कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अध्यक्ष व सदस्य सचिव यांना सादर करावा अशा सूचना मा अध्यक्षांनी संबंधिताना दिल्या. |

| आयत्या वेळचे विषय | | | | |
|---|---|---|---|---|
| अ क्र | विषय | विषय उपस्थित केलेली संस्था | संबंधित खाते | झालेली कार्यवाही |
| ४ | ग्रामपंचायत फाळा आकारणी बाबत- बांधकाम केलेल्या इमारतीवरील आकारणी १.८० पैसे प्रति स्के.फूट व रिकाम्या जागचे प्रति ०.२० पैसे याप्रमाणे सर्व ग्रामपंचायतीकडून आकारणी करण्यात यावी | मॅन्यु असो.कागल हातकणंगले | हुपरी, ग्रामपंचायत ग्रामसेवक | या बाबत संबंधित असोसिएशनने मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेशी संपर्क साधून सविस्तर माहिती दयावी अशा सूचना मा अध्यक्षांनी दिल्या व सदरचा विषय जिल्हा परिषद यांच्या धोरणात्मक बाबीशी निगडीत असल्याने सदरचा विषय कमी करण्यात आला. |
| ५ | फौंड्री वेस्ट मटेरियल टाकणे करीता खण अथवा भूखंड उपलब्ध करुन देणे बाबत<br>कागल पंचतारांकित औद्यो परिसरातील फौंड्री वेस्ट मटेरियल टाकणेसाठी औद्योगिक वसाहतीमधील खण अथवा भूखंड उपलब्ध करुन देणे बाबत | मॅन्यु असो.कागल हातकणंगले | १) कार्यकारी अभियंता एमआयडीसी<br>२) प्रादेशिक प्रदुषण नियंत्रण मंडळ | मा उद्योग मंत्री महोदय यांच्या दौरा कार्यक्रमाच्या भेटी मध्ये संबंधित औद्योगिक संघटनेने प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यावर मा मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम मुंबई यांनी महाराष्ट प्रदुषण नियंत्रण मंडळाने अशा खाणी शोधून काढाव्यात ज्यातून भूगर्भात सदर घनकच-यामधील घटक शोषणार नाही व पर्यावरणाची हानी होणार नाही आणि अशा खाणीची माहिती महसूल विभागास दयावी व त्यांच्या परवानगीने खाणी वापराबाबत पुढील कार्यवाही करावी अशी माहिती कार्यकारी अभियंता एमआयडीसी यांनी दिली.<br>मा अध्यक्षांनी सूचित केले की औद्योगिक संघटना यांनी मओवि महामंडळ व प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेशी संपर्क साधून अशा प्रकारची जागा उपलब्धता बाबत संबंधीत क्षेत्रा पाहणी करावी व त्या जागे बाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा असे सूचित केले |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | पोलीस स्टेशन इमारतीचे बांधकाम करणे बाबत | मॅन्यु असो.कागल हातकणंगले | १) पोलीस अधीक्षक<br>२) कार्यकारी अभियंता एमआयडीसी | एमआयडीसीने भूखंड दिलेला आहे. तथापी पोलीस स्टेशने इमारत बांधकामाचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केल्याचे नमूद केले. त्यानुसार संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिका-यांनी पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत मा जिल्हाधिकारी व सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांना देण्यात यावी असे सूचित केले. सदर प्रस्तावाची प्रत प्राप्त नंतर सदस्य सचिव यांनी जिल्हाधिकारी यांना अवगत करण्याचे सूचित केले |
| ७ | गोकुळ शिरगांव ते पंचतारांकित औद्योगिक <u>वसाहत रोड करणे बाबत</u><br>पंचतारांकित औद्यो.क्षेत्राकडे येणारा रोड हा हलसवडे ग्रामपंचायत हद्दीतील रोड अंदाजे ५०० मीटर हा कच्चा रोड राहिलेला आहे. सदरचा रोड जिल्हा परिषदेकडे येत असल्याने तो अद्याप डांबरीकरण करणेत आलेला नाही | मॅन्यु असो.कागल हातकणंगले | कार्यकारी अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद<br>कार्यकारी अभियंता, एमआयडीसी | सदरचे काम एमआयडीसीने / जिल्हा परिषदने करणे बाबत प्रयन्त करावेत असे मा अध्यक्षांनी सांगितले. सदर ठिकाणी अतिक्रमण असल्याचे बैठकीत सांगितल्या नंतर या बाबतचा निश्चित प्रस्ताव सादर करावा ज्या मध्ये अतिक्रमणाची माहितीचा समावेश असावा जणेकरुन सदरचे अतिक्रमण काढण्यासाठी आवश्यकत्या सूचना संबंधितांना देण्यात येतील असे सूचित करण्यात आले |
| ९ | अग्नी शमन विभागाच्या जाचक अटी रद्द <u>करणे बाबत</u>-<br>औद्यो.वसाहतीमध्ये नवीन उद्योग उभारताना किंवा विस्तारीकरण करताना | शिरोली मॅन्यु असो.<br>शिरोली एमआयडीसी | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्यो.विकास महामंडळ, कोल्हापूर | फायर Noc ही नॅशनल बिल्डींग कोड व औद्योगिक सुरक्षा धोरणानुसार आवश्यक त्या सुविधा लावणे आवश्यक आहे. हा नियम व कायदयानुसार कारखाना मालमत्ता व जिवीत हानी होऊ नये म्हणून हि सुविधा ठेवणे गरजेचे आहे. तथापि या पूर्वी मागणी झाले नुसार ५००० चौ.मी क्षेत्रफळाच्या भूखंडावर जेथे रेड कॅटॅगरी प्रदूषण मंडळाची संम्मती नाही अशा उद्योजकांना महामंडळाच्या स्थानिक कार्यालयाकडून Provisional Fire Noc त्वरीत देणेत येते. त्यामुळे सर्वसामान्य लहान उद्योजकांना अशा प्रकारची फायर Noc घेण्यास कोणतीही अडचण येत नाही. तसेच जमिनी खालील पाण्याची टाकी, मोठया क्षमतेचे पंप |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | MIDC कडून उद्योगांनी अग्णी शमनची महागडी उपकरणे व यंत्रणा, वॉटर टॅक बसविणेसारख्या जाचक अटी लादल्या आहेत | | | बसवण्याबाबतही सवलत देणेत आलेली आहे. असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले आहे.<br>मा अध्यक्षांनी सांगितले की, शासन निर्णया नुसार कार्यवाही करणेत येत असल्याने शासनाच्या नियमात बदल करता येणे शक्य नाही. त्यामुळे सदर विषय कमी करण्यात यावा अशा सूचना मा अध्यक्षांनी दिल्या |
| १० | नांगाव फाटा येथे उड्डाण पूल होणे बाबत- शिरोली औद्यो.वसाहती जवळ नागांव फाटा येथे हायवेवर उड्डान पुल नसलेने लहान मोठे रोज अपघात होत आहेत | शिरोली मॅन्यु असोसिएशन शिरोली एमआयडीसी | रस्ते विकास महामंडळ, कोल्हापूर | सद्यपरिस्थीत रस्ते विकास महामंडळ व मओवि महामंडळ यांनी संयुक्तरित्या पाहणी करुन होणारे अपघात टाळणेसाठी योग्य ठिकाणी दिशा दर्शक फलक लावावेत अशा सूचना मा अध्यक्षांनी संबंधितांना दिल्या व सदर विषय कमी करण्यात आला. |
| ११ | इंडस्ट्रियल एफएसआय एमआयडीसी प्रमाणे वाढवून मिळणे बाबत | लक्ष्मी इंड.मॅन्यु. असोसिएशन, हातकणंगले, जि कोल्हापूर | उद्योग विभाग व टॉऊन प्लॅनिंग | नगर रचना विभागाने नव्याने प्राप्त झालेल्या एफएसआय बाबतच्या शासन निर्णयाची प्रत संबंधित औद्योगिक संघटना व इतर सर्व औद्योगिक वसाहती व संघटना यांना देणे बाबत सूचित केले व सदरचा विषय कमी करण्याचे ठरले. |
| १२ | एस टी मिनी बस सेवा सुरु करणेबाबत<br>या वसाहतीमध्ये जवळपास ७ ते ८ हजार लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष काम करीत आहेत त्यामध्ये महीला कामगारांची संख्या | लक्ष्मी इंड.मॅन्यु.असोसिएशन, हातकणंगले, जि कोल्हापूर | व्यवस्थापक, महाराष्ट्र परिवहन महामंडळ | सदर ठिकाणची पाहणी करुन असोसिएशनने मागणी केले प्रमाणे बस सेवा सुरु करणे संदर्भाने योग्यती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अध्यक्ष व सदस्य सचिव यांना सादर करावा अशा सूचना मा अध्यक्षांनी उपस्थित एस टी च्या प्रतिनिधांना दिल्या. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | हजार ते पंधराशेच्या आसपास आहे परंतु त्यांना सध्या वसाहतीमध्ये येण्याजाण्यासाठी एस टी बसची सुविधा नाही | | | |

वरील प्रमाणे सभेत विषयावार चर्चा होवून सर्व उपस्थितांचे आभार मानले नंतर सभा समाप्त झाली.

सही/-
महाव्यवस्थापक, जि उ के तथा
सदस्य सचिव, जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, कोल्हापूर

सही/-
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, कोल्हापूर